MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात



## निसर्गाचा अंदाज काढलेला पंजाबराव डक यांचा खरोखर ठरला

परळी (प्रतिनिधी)

परिसरातील हवामान खात्याने अंदाज काढलेल्या पंजाबराव डक यांच्या अंदाजाने सर्व शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण चालू आहे त्यांनी सांगितल्याप्रमाणे २१ ९ २०२४ ला पाऊस येणार म्हणजे येणार अशी त्यांनी सांगितल्यामुळे शेतकऱ्यांना सोयाबीन पीक २१ पर्यंत काढून घ्या अशा सूचना केल्या होत्या व २१ नंतर प्रत्येक गावाला तीन दिवस पाऊस पडणार आहे व माजलगाव धरण फुल भरणार अशी घोषणा त्यांनी त्यांच्या अंदाज पत्रात काढलेले आहेत तरी पंजाबराव डक यांचे सर्व शेतकरी वर्गामध्ये त्यांच्या नावाची चर्चा चालू आहे योग्य विश्राम म्हणजे पावसाची सुरुवात झाली ज्यांच्याकडे कापूस आहे अशा शेतकऱ्यांना खूप पावसाची गरज होती बारा दिवसाची उघड झाल्यानंतर एकच आशा उरली होती ती पंजाबराव डक यांची त्यांनी २१ तारखेला ला पाऊस सांगितल्यामुळे सर्व शेतकरी त्या २१ दिवसाची पाऊस पडण्याची वाघ वाट बघत होते बरोबर त्या दिवशी रात्री नऊला खूप असा पाऊस मोठा झाला त्यामध्ये शेतकऱ्यांचे आनंद चर्चा करू लागले आहे तरी पंजाबराव डक यांनी अशीच माहिती दिल्यास शेतकऱ्याचे काही नुकसान होणार नाही सर्व शेतकऱ्यांना ज्या दिवशी सांगितलं त्याच दिवशी पाऊस आल्यामुळे सर्व शेतकरी परिसरातील आनंदी नाही झाले आहे

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०२ | अंक -०५ | रविवार दि.२२ सप्टेंबर २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -05 | SUNDAY DT.22 SEPTEMBER 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# जालना, पुणेनंतर आता अहमदनगर बंदची हाक; मनोज जरागेंच्या समर्थनार्थ सकल मराठा रस्त्यावर

अहमदनगर : मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा आमरण उपोषण सुरू केलं असून आज उपोषणाचा ६ वा दिवस आहे. एकीकडे मराठा समाज मनोज जरांगे यांच्या समर्थनार्थ महाराष्ट्रात एकत्र आला असून अंतरवाली सराटीत देखील समाजाने गर्दी केली आहे. दुसरीकडे मनोज जरांगे यांच्या उपोषणाला आव्हान देत ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनीही उपोषण सुरू केलं असून त्यांच्या उपोषणाचा आज ४ था दिवस आहे. वडगोद्री येथे हाकेंनी उपोषण सुरू केल्यामुळे जालना जिल्ह्यात ओबीसी आणि मराठा समाजात तणावाचे वातावरण निर्माण झालं आहे. त्यातच, मराठा समाजाने जालना जिल्हा बंदची हाक देण्यात आली आहे. त्यानंतर, परभणी आणि पुणे जिल्ह्यातही मराठा समाजाने बंदची हाक दिली आहे. आता, सकल मराठा समाजाकडून अहमदनगर जिल्हा बंदची देखील हाक देण्यात आली




आहे. सकल मराठा समाजाच्यावतीने उद्या अहमदनगर जिल्हा बंदची हाक देण्यात आली आहे. मराठा आरक्षणासाठी लढा देणारे मनोज जरांगे पाटील यांनी आंतरवाली सराटी येथे आमरण उपोषणाला सुरुवात केलीय. या आंदोलनाला पाठिंबा म्हणून उद्या अहमदनगर जिल्हा बंदची हाक देण्यात आली आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ अहमदनगर तहसील कार्यालयासमोर गेल्या दोन दिवसापासून आमरण उपोषण देखील सुरू आहे. सगे-सोयरे अधिसूचनेची अंमलबजावणी करा, हैदराबाद गॅझेट लागू करा, सातारा गॅझेट लागू करा, बॉम्बे गव्हर्मेंट गॅझेट लागू करा, मराठा बांधवांवर दाखल झालेले गुन्हे मागे घ्या, अशा विविध मागण्यांसाठी हे उपोषण सुरू असून, त्याच पार्श्वभूमीवर उद्या विविध जिल्ह्यात बंदची हाक देण्यात आली असून अहमदनगर जिल्हा बंदची देखील हाक देण्यात आली आहे.

## हिंगणगाव गोदापात्रात अवैध वाळू उपसा करणाऱ्यांवर स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई!

### तीन केन्या व ट्रॅक्टरसह पंधरा लाखांचा मुद्देमाल जप्त

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : तालुक्यातील हिंगणगाव गोदापात्रातुन अवैध वाळू उपसा होत असल्याची माहीती स्थानिक गुन्हे शाखेला मिळताच दि.२१ रोजी दुपारी चार वाजता छापा टाकून तीन केन्या, ट्रॅक्टरसह साधारण १५ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यासोबतच अवैधरीत्या वाळू उपसा करून चोरी करणाऱ्या तिघांना ताब्यात घेण्यात आले



आहे. गेवराई तालुक्यातील गोदावरी पात्र हे अवैध वाळू उपशाचे कुरण होऊन बसले आहे. मात्र, गेवराईचे पोलिस प्रशासन आणि महसूल प्रशासनाला याची खबरबात न लागता. बीडचे स्थानिक गुन्हा शाखेकडून शनिवारी दुपारी चार वाजता हिंगणगाव परिसरात छापा टाकून अवैध वाळू उपसा करणाऱ्या तीन केन्या व ट्रॅक्टरसह साधारण १५ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, तीन जण पोलीसांनी ताब्यात घेतले आहेत. सदरील कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उस्मान शेख, फौजदार ए.एस.मुरकुटे, पोलीस हवालदार ठोंबरे अदीने केली आहे. याच महिन्यात बीडच्या गुन्हा शाखेकडून गेवराईतील वाळूच्या संदर्भातील तीसरी कारवाई आहे.

## विवाहितेस आत्महत्येस प्रवृत्त केल्या प्रकरणी पतीसह जाऊबाईवर गुन्हा दाखल

### बेपत्ता विवाहितेचा घराशेजारील विहीरीत आढळला होता मृतदेह

आष्टी (सुरेश कांबळे)

,बेपत्ता २६ वर्षीय विवाहित महिलेचा घराशेजारील विहीरीत शुक्रवारी सकाळी मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली होती.या प्रकरणी पतीसह जाऊबाईवर आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला असुन पतीला अंभोरा पोलिसांनी अटक केली आहे.

आष्टी तालुक्यातील दादेगांव येथील आयोध्या दत्तात्रय कोल्हे वय वर्ष २६ ही विवाहीत महिला सतत घरगुंती वाद होत असल्याने १८ रोजी सकाळी बेपत्ता झाली होती.दुसऱ्या दिवशी पतीने अंभोरा पोलिस ठाण्यात मिसींग दाखल केल्यानंतर तिसऱ्या दिवशी स्वताच्या शेतातील विहीरीत मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली होती.सुलेमान देवळा प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदन करण्यात आल्यानंतर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आला. अंत्यविधी झाल्यानंतर उशिरा अंभोरा पोलिस ठाण्यात मयत विवाहीतेचा भाऊ संतोष पांडूरंग पोकळे रा.चिंचाळा ता.आष्टी याच्या फिर्यादीवरून आरोपी पती दत्तात्रय दशरथ कोल्हे व जाऊबाई राणी कोल्हे हे सतत मानसिक व शारीरिक छळ करत असल्याने विवाहीतेने विहीरीत उडी घेऊन आत्महत्या केली.तिला पती व जाऊबाई या दोघांनी आत्महत्येस प्रवृत्त केल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास अंभोरा ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे करीत आहेत.

## माजलगावात ईद-ए-मिलादुन्नबी उत्साहात!

### मिरवणुकीत हजारो तरुणांचा सहभाग

माजलगाव (प्रतिनिधी)

माजलगावात ईद-ए-मिलादुन्नबी निमित्त मुस्लिम समुदायाकडून देशात सुख शांती,एकोपा नांदो!अशी विश्वशांतीसाठी रविवारी प्रार्थना करण्यात आली.यावेळी अहेले सुन्नत वल जमातच्या वतीने शहरात(मिरवणूक)जुलूस उत्साहात काढण्यात आली.दरम्यान धार्मिक ध्वज फडकवण्यात आले.

मुस्लिम समाजातील लोकांमध्ये ईद-ए-मिलादला मोठे धार्मिक महत्त्व आहे.हा दिवस जगभरातील सर्व मुस्लिम मोठ्या उत्साहाने आणि आनंदाने साजरा करतात. यानिमित्त शहरातील अहेले सुन्नत वल जमातच्या वतीने जल्लोषात मरकझी जुलुसे(मिरवणूक) आयोजन केले होते.या मिरवणुकीत अबाल- वृद्धांनी धार्मिक ध्वज पताका घेत जशने ईद मिलादुन्नबी जिंदाबाद,नारा ए तकबीर अल्लाहू अकबर अशा विविध घोषणांनी परिसर दणाणून सोडला.पोलिस प्रशासनातर्फे मिरवणुकीचे(जुलूस) स्वागत करण्यात



आले.डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक या ठिकाणी काही तरुण संघटनांच्या कार्यकर्त्यांनी सहभागी भक्तांना मिठाईचे,वाटप केले.याप्रसंगी मिरवणूक जुलूस कमिटीचे दुसऱ्यांदा अध्यक्ष झालेले सय्यद सलीमबापू यांच्यासह सय्यद सिराजोद्दीन कादरी,युसुफोद्दीन कादरी,आगाखान,खतीब अलीमोद्दीन,शेख मुस्किम बाबा, सय्यद रईस कादरी,शेख मेहबूब, सय्यद रफिक कादरी,शेख आसेफभाऊ,सय्यद फारुखअण्णा, सय्यद तौफिक कादरी,सय्यद रहीम,इर्शाद इनामदार,सय्यद समीर,इलियास शेख,शेख फेरोज, महेमूद मिर्झा इत्यादीचे निटके नियोजन होते.माजी नप बांधकाम सभापती राजेश साळवे,नगरसेवक सुशांत पौळ,अशोक लांडगेसर यांच्यासह अनेकांनी सहभाग घेतला होता.

## विकासकामांच्या नावाखाली तोडलेली झाडे लावणार कधी ?

### वनविभागाच्या ढिसाळ कारभारामुळे बीड जिल्ह्याचे वाळवंट :- डॉ.गणेश ढवळे

बीड (प्रतिनिधी)

मराठवाड्यातील बीड जिल्ह्यात २.४ ईतके कमी वनक्षेत्र असुन निसर्गाचा समतोल राखण्यासाठी ३३ टक्के वनक्षेत्र अपेक्षित असताना वनक्षेत्र कमी असल्याने वारंवार दुष्काळाचे संकट ओढावत आहे.हरितक्षेत्र वाढवण्यासाठी शासनाकडून झाडे लावा झाडे जगवा जाहिरात बाजी करत कोट्यवधींचा खर्च करण्यात येतो.मात्र वृक्षलागवड कागदोपत्रीच दिसून येते.त्यात भरीस भर म्हणून विकासकामांच्या नावाखाली रस्ता रुंदीकरण अथवा रेल्वे लाईन ब्राड रोडवेज कामासाठी ५० वर्षापुर्वीचे महाकाय चिंच ,लिंब ,वड,पिंपळ,नांदुरकी आदि वृक्षांची



कत्तल करण्यात ये मात्र पर्यावरणाचे रक्षण व्हावे यासाठी पाचपट झाडे लावणे बंधनकारक असताना काम पूर्ण होऊन ५ वर्षे उलटुनही संबंधित कंत्राटदार कंपनीकडून वृक्षलागवड करण्यात येत नाही.सामाजिक कार्यकर्ते यांच्या लेखी तक्रारी, आंदोलनानंतर सुद्धा जिल्हा प्रशासन आणि विभागाच्या ढिसाळ कारभारामुळे आणि अर्थपूर्ण दुर्लक्षामुळे बीड जिल्ह्याचे वाळवंट झाले असल्याची खंत सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे आणि रामनाथ खोड यांनी बोलुन दाखवली. अहमदनगर - बीड - परळी नविन ब्रॉड गेज लाईन प्रकल्पासह राष्ट्रीय महामार्ग २११ धुळे ते सोलापूर हायवेवरील जवळपास ५० महाकाय वृक्ष वनविभागाच्या परवानगीने तोडण्यात आली आहेत.मात्र याचवेळी वृक्ष लागवडी बाबत जिल्हा प्रशासन आणि वनविभाग मुग गिळून गप्पच आहे.एकीकडे पर्यावरण संरक्षणाचा आंतरराष्ट्रीय पुरस्कार मुख्यमंत्र्यांना मिळाला मात्र बीड जिल्ह्याचे वाळवंट झाले तरी जिल्हा प्रशासन व वनविभागाला सोयरंसुतक नाही :- डॉ.गणेश ढवळे जागतिक तापमान वाढीचे युग संपुन होरपळीचे युग सुरू झाले असुन ठोस निर्णय घेण्याचे आवाहन संयुक्त राष्ट्र संघटनेने केले असुन महाराष्ट्र शासनाने भविष्यातील धोका ओळखून मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांनी पर्यावरण विषयक महत्वाचे निर्णय घेऊन अंमलबजावणी साठी एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली पर्यावरण व शाश्वत विकास कृती समितीची स्थापना करण्यात आली असुन पर्यावरण व शाश्वत विकासासाठी करत असलेल्या कार्याची दखल थेट आंतरराष्ट्रीय पातळीवरून घेऊन दुसरा जागतिक कृषी पुरस्कार एकनाथ शिंदे यांना १८ सप्टेंबर रोजी प्रदान करण्यात आला आहे. मात्र दुसरीकडे बीड जिल्हा प्रशासन आणि वनविभाग यांना याचे काहीही सोयरेसुतक नसल्याचे दिसून येत असल्याची खंत डॉ.गणेश ढवळे यांनी बोलून दाखवली.

# अंबाजोगाई - लातूर रोडवर कार-कंटेनरचा भीषण अपघात; चार जण जागीच ठार

प्रतिनिधी /प्रतिनिधी

अंबाजोगाई लातूर रोडवरील पाचपीर दर्याजवळ रविवारी पहाटे स्विफ्ट कार आणि कंटेनरचा भीषण अपघात झाला. या अपघातात स्विफ्ट कार मधील चौघेही जागीच ठार झाले. सर्व मयत लातूर जिल्ह्यातील चाकूर तालुक्यातील जगलपूर येथील असून त्यांची नावे अद्याप समजू शकलेली नाहीत सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार शनिवारी रात्री उशीरा जगलपूर येथील चार जण स्विफ्ट कार मधून (एमएच २४ एएस ६३३४) औरंगाबादला निघाले होते. रात्री सुरू असलेल्या मुसळधार पावसात अंबाजोगाई लातूर रोडवरील पाचपीर दर्गा जवळ त्यांच्या कारची आणि समोरून येणाऱ्या कंटेनरची (एमएच १२ एमव्ही ७१८८) जोरदार धडक झाली. यावेळी कार कंटेनरच्या खाली घुसल्याने कारचा चुराडा झाला आणि आतील चौघांचा जागीच मृत्यू झाला. हा भीषण अपघात रविवारी पहाटे एक वाजताच्या सुमारास झाला. अपघाताची माहिती मिळताच बर्दापूर पोलीस ठाण्याचे एपीआय ससाणे, पीएसआय यादव, सहा. फौजदार बिडगर, हेड कॉन्स्टेबल शेख, कर्मचारी यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली सर्व मृतदेह अंबाजोगाईच्या शासकीय



रुग्णालयात हलविण्यात आले आहेत. अपघाताच्या वेळी मुसळधार पाऊस सुरु होता, त्यामुळे चालकांना समोरून येणाऱ्या वाहनाचा अंदाज न आल्याने अपघात झाला असावा अशी शक्यता वर्तविण्यात येत आहे. दरम्यान, लातूरहून अंबाजोगाईकडे येणारा चौपदरी रस्ता बर्दापूरच्या पुढे दुपदरी करण्यात आला आहे. अचानक निमुळता झालेल्या या रस्त्याने आतापर्यंत शेकडो लोकांचे बळी घेतले आहे. त्यामुळे हा रस्ता लोखंडी सावरगावपर्यंत चौपदरी करावा अशी मागणी पुन्हा जोर धरू लागली आहे

# होम मिनिस्टरला महिलांचा वाढता प्रतिसाद

## मातोश्रीवर देखील महिला भगिनींची अलोट गर्दी

**बीड (प्रतिनिधी) माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या चार दिवसापासून सुरू झालेल्या होम मिनिस्टर चंपावती सम्राज्ञी या कार्यक्रमाला पहिल्या दिवसापासूनच महिलांचा प्रचंड प्रतिसाद मिळू लागला आहे आजही चौथ्या दिवशी शहरातील मातोश्री मंगल कार्यालयात महिलांनी अलोट गर्दी केली होती**


माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या संकल्पनेतून काकू- नाना प्रतिष्ठान आयोजित होम मिनिस्टर चंपावती सम्राज्ञी २०२४ खेळ पैठणीचा हा कार्यक्रम बीडच्या मातोश्री मंगल कार्यालय पेठ बीड प्रभाग क्रमांक चार या भागातील महिलांचा मोठा प्रतिसाद मिळाला, या स्पर्धेचे उद्घाटन सौ.रूपालीताई सतीश पवार यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी महिला आघाडीच्या अध्यक्ष सौ.जयश्रीताई विधाते सौ. राखी राणा चव्हाण सौ. प्रेमलताताई चांदणे, सौ. मनीषाताई क्षीरसागर, डॉ . सुप्रियाताई क्षीरसागर सौ. गंगासागर गोरे, सौ. राजकन्याताई पवार सौ. वर्षाताई लोळगे, डॉ



अबोलीताई मसुरे- पांगारकर अंजलीताई पवार सौ. भारतीताई राजेश क्षीरसागर,सौ. कीर्तीताई पांगारकर, सौ.अर्चनाताई पांगारकर प्रमुख महिलांच्या उपस्थितीत व श्री बंडू निसर्गंध , श्री सतपाल लाहोट, डॉ प्रमोद पवार, श्री राजेश क्षीरसागर या प्रमुख कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत या स्पर्धेचे उद्घाटन झाले. होम मिनिस्टर स्पर्धेला महिलांनी पाण्या पावसाची तमान बाळगता व्यस्त संसारातून आपल्या आनंदासाठी , मन रिजविण्यासाठी या स्पर्धेला उस्फूर्त सहभाग नोंदविला.

होम मिनिस्टर संपावती सम्राज्ञी २०२४ खेळ पैठणीचा ही स्पर्धा प्रसिद्ध निवेदक सुरेश साळुंखे यांच्या बहारदार व विनोदी शैलीने पार पडली . या स्पर्धेचा अंतिम निकाल प्रथम पैठणी विजेती महिला सौ. मनीषा पवन सपकाळ या ठरल्या ,द्वितीय बक्षीस इमिटेशन ज्वेलरीच्या मानकरी सौ. रेणुका नंदन पवार तृतीय बक्षीसच्या मानकरी सौ. गौरी अजय क्षीरसागर या ठरल्या तर उर्वरित सात महिलांना आकर्षक गिफ्ट हॅम्पर देण्यात आले. यामध्ये सौ. रेखा महादेव काळे अश्विनी नाथा सत्वधर,सौ. अबोली सुनील मसुरे सौ. राणी अजय जाधव सौ. जयश्री सुनील निर्मळ या महिला

७ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या अंतिम फेरी करिता या सर्व महिलांची निवड झाली. मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिसरातील कार्यकर्ते पदाधिकारी, नगरसेवक व नागरिक यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमास महिला भगिनी हजारोच्या संख्येने उपस्थित होत्या.



## शिरूर च्या प्रथम नगराध्यक्षांना समाजसेवक सुरेश पाटील यांनी दिल्या शुभेच्छा..!

शिरूर (का.) /प्रतिनिधी

आष्टी मतदारसंघातील शिरूर कासार शहराच्या नगरपंचायतचे प्रथम नगराध्यक्ष रोहिदासभाऊ गाडेकर यांना शिव संघर्ष ग्रुप महाराष्ट्र राज्याचे पदाधिकारी तथा सामाजिक कार्यकर्ते सुरेश पाटील यांनी दिल्या वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा. यावेळी त्यांचा फेटा, शाल व श्रीफळ देऊन सहृदय सत्कार करून भावी आयुष्याच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

शिरूर कासार शहराचे ज्येष्ठ नेते तथा नगरपंचायत चे प्रथम नगराध्यक्ष रोहिदास भाऊ गाडेकर यांचा वाढदिवस शहरात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. रोहिदास भाऊ गाडेकर गेली ४० वर्षे राजकीय जीवनात विविध पदावर उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे. त्यांच्या जीवनात त्यांनी अनेक निवडणुका लढल्या आणि जिंकल्याही.

## अट्टल महाविद्यालयात आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राचे उद्घाटन संपन्न

**प्रतिनिधी । गेवराई**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील कौशल्याभिमुख शिक्षणाचे महत्व ओळखून महाराष्ट्र राज्यातील महाविद्यालयीन युवक- युवतींना कौशल्य विकासाच्या संधी देऊन रोजगारक्षम बनवण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्रालयाच्या वतीने राज्यातील एक हजार नामांकित महाविद्यालयात आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र स्थापन करण्याचा मानस समोर ठेवला होता. त्यानुसार मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, र. भ. अट्टल महाविद्यालयाची आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र योजनेसाठी निवड करण्यात आली. या केंद्राच्या आभासी उद्घाटन समारंभासाठी एक हजार महाविद्यालयापैकी उत्कृष्ट ५५ महाविद्यालयांचा समावेश होऊन देशाचे प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालींद्वारे (आभासी) दि. २१ सप्टेंबर २०२४ रोजी हा समारंभ संपन्न झाला. आचार्य



चाणक्य कौशल्य विकास केंद्रांतर्गत महाविद्यालयात 'जीएसटी असिस्टंट' आणि 'ग्राफिक डिझाईन' हे दोन कौशल्य विकास अभ्यासक्रम मंजूर झाले आहेत. या सम्पूर्ण सोहळ्याचे ऑनलाईन पद्धतीने झाले. या कार्यक्रमासाठी अट्टल महाविद्यालयात बीड जिल्हाधिकारी श्री. अविनाश पाठक, बीड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष श्री. विजयसिंह पंडित, जिल्हा कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता केंद्र उपायुक्त श्री. सुशील उचले, गेवराई येथील तहसीलदार श्री. संदीप खोमणे, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य, लोकप्रितिनिधी, विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. महविद्यालयाच्या प्राचार्य प्रो. रजनी शिखरे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमासाठी उपप्राचार्य प्रो. विजय सांगळे, डॉ. प्रशांत पांगरीकर यांच्यासह सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# दोन्ही मुंडेंना विरोध, आ.पवारांच्या मनात आहे तरी काय?

**प्रतिनिधी । गेवराई**

गेवराई मतदारसंघातून २ वेळा भाजपच्या तिकिटावर निवडून आलेले आ. लक्ष्मण पवार यांनी काही दिवसांपूर्वी बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्यावर टीका करत विधानसभा निवडणूक न लढविण्याची घोषणा केली होती. त्यामुळे राजकीय क्षेत्रात खळबळ उडालेली असतानाच आता त्यांनी भाजपच्या नेत्या आ. पंकजा मुंडे यांच्यावरही अप्रत्यक्ष टीका केली आहे. पंकजा मुंडे कधी जिल्ह्यात येतच नव्हत्या आणि त्यांनी आम्हाला वेळ दिला नाही असे म्हणत आ. लक्ष्मण पवार यांनी आता दोन्ही मुंडेंच्या विरोधी सूर लावला आहे, त्यामुळे आ.लक्ष्मण पवार यांच्या मनात नेमके आहे तरी काय ? त्यांना कोणती वाट चालायची आहे याची चर्चा सध्या मतदारसंघात आहे.

गेवराईचे आमदार लक्ष्मण पवार हे दोन वेळा भाजपच्या तिकिटावर आमदार झालेले आहेत. पवार कुटुंबातील विधानसभेत गेलेली लक्ष्मण पवार ही तिसरी पिढी. पण पवार कुटुंब हे तसे ना जनसंघाचे, ना मूळ भाजपचे. लक्ष्मण पवार यांचे आजोबा शाहूराव पवार हे कम्युनिस्ट पक्षाकडून आमदार (१९६७) झालेले तर लक्ष्मण पवार यांचे वडील माधवराव हे शरद पवारांच्या काँग्रेसकडून (१९८०) आमदार झालेले . पवार कुटुंबाचा तसा भाजपशीसंबंध आला तोच मुळी लक्ष्मण पवार यांच्यापासूनच. २००९ च्या निवडणुकीत अमरसिंह पंडित यांचा भाजपच्या तिकिटावर अल्पमतानी पराभव झाला आणि त्या पराभवाला भाजपमधीलच काही लोक जबाबदार आहेत असे मानून त्या निवडणुकीनंतर अमरसिंह पंडित साहेबांनी भाजप सोडला. म्हणून २०१४ च्या निवडणुकीत पंकजा मुंडेंनीच लक्ष्मण पवार यांना उमेदवारी दिली आणि निवडणून देखील आणले. २०१४ आणि २०१९ या दोन निवडणुका लक्ष्मण पवारांनी भाजपच्या कमळावर जिंकल्या. पण भाजपच्या संघटनेशी त्यांचे फारसे कधी जमले नव्हते. मतदारसंघात आ. पवारांची स्वतःची अशी 'लक्ष्मणसेना 'कायम कार्यरत राहिलेली आहे. मागच्या काही वर्षात असेही आ. पवार भाजपमध्ये तसे पंकजा मुंडेंपासून दुरावले होतेच. ते फडणवीसांच्या



अधिक जवळ जात असल्याचे लक्षात आल्यानंतर भाजपमधील मुंडे समर्थकांनी त्यांच्यापासून सुरक्षित अंतर ठेवले. आता तर त्यांनी अगोदर धनंजय मुंडे यांच्यावर टीका केली आणि लगेच आपण पंकजा मुंडेंना देखील अनेकदा आपल्या अडचणी सांगितल्या, भेटीची वेळ मागितली, पण त्यांनी आमचे ऐकून घेतले नाही, आम्हाला वेळ दिला नाही असे म्हटले आहे. म्हणजे एक पर्कजारे त्यांनी पंकजा मुंडे यांच्याबद्दलही जाहीर नाराजी व्यक्त केली आहेच. आ. पवार यांनी भलेही आपण किंवा आपल्या कुटुंबातील कोणी विधानसभा निवडणूक लढविणार नाही असे म्हटले असेल, मात्र ते कोणालाच पटणारे नाही. आ. पवार मागच्या काही काळात प्रकृती अस्वास्थ्यामुळे प्रेषण आहेत, मात्र त्या काळात त्यांचे पुतणे शिवराज पवार यांनी मतदारसंघात संपर्क वाढविलेला आहेच. शिवराज पवार यांना पैठणहून 'खुले ' मार्गदर्शन होत असते अशी चर्चा आहे.

त्यामुळे पवारांच्या कुटुंबातले कोणी निवडणूक लढविणार नाही हे तर शक्य नाही. मग (श्ररारप ग्रिी) आ. पवारांना भाजप आणि महायुतीमधून भर पडायचे आहे का ? आजच्या घडीला मराठा समाजाचा भाजपवर मोठा रोष आहे. त्यातही गेवराई मतदारसंघात मनोज जरांगे यांच्या आंदोलनाचा मोठा प्रभाव आहे. त्यामुळे भाजपोची उमेदवारी आपल्या अडचणी वाढवू शकते हे लक्षात घेऊनच तर आ. पवार हे सारे बोलत नाहीत ना आणि त्यांना तुतारीच हाती घ्यायची आहे का ? याच्या चर्चा मतदारसंघात सुरु आहेत.

## महाविकास आघाडीचं ठरलं!

# विधानसभा निवडणुकीत १०५, ९५, ८८ चा फॉर्म्युला

**प्रतिनिधी । बीड**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी विरोधी आघाडीची महाविकास आघाडी (एमव्हीए) निवडणूक तयारीला वेग आला आहे. महाविकास आघाडीतील घटक पक्षांमध्ये जागावाटपाचा फॉर्म्युला जवळपास निश्चित झाला आहे. आघाडीचा भाग असलेल्या काँग्रेसला लोकसभा निवडणुकीत दमदार कामगिरीचा फायदा झाल्याचा दावा सूत्रांनी केला आहे. माविआमध्ये मुंबईतील ९० टक्के जागांवर एकमत झाल्याचा दावा सूत्रांनी केला आहे. आता शुक्रवारपासून महायुतीत महाराष्ट्रातील जागांची चर्चा सुरू झाली आहे. प्राथमिक चर्चेत एमव्हीएमध्ये



१०५, ९५ आणि ८८ या फॉर्म्युल्यावर निवडणूक लढवण्याची तयारी सुरू आहे.

गुरुवारी महाविकास आघाडीतील घटक पक्षांची बैठक सोफिटेल हॉटेल, वांद्रे-पूर्व बीकेसी, मुंबई येथे झाली. बैठकीला उपस्थित असलेल्या एमव्हीएच्या एका ज्येष्ठ नेत्याने सांगितले की चर्चा सकारात्मक झाली आणि मुंबईतील शिवसेना उद्धव गटाचा प्रभाव सर्वांनी स्वीकारला. या आधारे मुंबईत उद्धव गटाला २२ जागा देण्याचे मान्य करण्यात आले आहे. मात्र उद्धव गट २३ जागांची मागणी करत आहे. उर्वरित १४ जागांवर काँग्रेस आणि राष्ट्रवादी यांच्यातील समन्वय आणि जिंकण्याची क्षमता याच्या आधारे एकमत होणार आहे.

काही जागांच्या अदलाबदलीवर चर्चा होणार आहे. या बैठकीत प्रथम काँग्रेस ११५ जागांच्या मागणीवर ठाम राहिली, तर शिवसेना (उद्धव गट) किमान १०० जागांच्या मागणीवर ठाम राहिल्याचा दावा सूत्रांनी केला आहे. मात्र प्रदीर्घ चर्चेनंतर काँग्रेसने १०५ जागांवर तर उद्धव गटाने ९५ जागांवर निवडणूक लढविण्याचे मान्य केले.

# जरांगे पाटलांच्या समर्थनार्थ लिंबागणेश कडकडीत बंद

**प्रतिनिधी । लिंबागणेश**

मराठा आरक्षण संघर्ष योध्दा मनोजजी जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला ओबीसीतुन आरक्षण मिळावे यासाठी अंतरवली सराटी येथे सहाव्यांदा आमरण उपोषण सुरू केले असुन आज उपोषणाच ५ वा दिवस असुन त्यांची प्रकृती खालावली आहे.सरकारकडुन वारंवार मराठा आरक्षण बाबतीत शब्द देऊनही चालढकल करण्यात येत असुन मुख्यमंत्री, मंत्रीमंडळ दिलेल्या शब्दाला जागत नाहीत.त्यामुळे सगेसोयरे अधिसुचनेची अंमलबजावणी करा, हैदराबाद, मुंबई आणि सातारा गॅझेट लागु करा, अंतरवली सराटीसह राज्यात मराठा आंदोलनाच्या निमित्ताने दाखल गुन्हे मागे घेण्यात यावेत.मराठा




आरक्षणासाठी बलिदान दिलेल्या कुटुंबातील सदस्यांना शासकीय नोकरीत सामावून घ्यावे.मराठा आणि कुणबी एकच असुन अध्यादेश पारित करून कुणबी प्रमाणपत्र देण्यात यावे या मागण्यांसाठी उपोषण सुरू केले असुन त्यांच्या समर्थनार्थ बीड जिल्हा बंदची हाक देण्यात आली असुन लिंबागणेश येथील सर्व बांधवांनी दुकाने बंद ठेवून उत्स्फूर्तपणे बंद मध्ये सहभाग घेतला. शिवतीर्थ याठिकाणी एकत्र जमा होत जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ लढेंगे जितेंगें हम सब जरांगे ,एक मराठा लाख मराठा जरांगे पाटील तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है म्हणत जरांगे पाटील यांची प्रतिमा घेऊन घोषणाबाजी केली. यावेळी लिंबागणेश पोलिस चौकीचे अंमलदार संतोष राऊत आणि बाबासाहेब डोंगरे यांच्या मार्फत पोलिस अधीक्षक बीड यांना लेखी निवेदन देण्यात आले. कायदा व सुव्यवस्था सांभाळून शांतता राखत बंद पाळण्यात आला.यावेळी डॉ.गणेश ढवळे, बालासाहेब जाधव,कल्याण वाणी, विक्रांत वाणी, अक्षय वाणी,सुरेश ढवळे,अशोकराजे वाणी,अँड.गणेश वाणी, संजय सुकाळे,दामु थोरात, विनायक वाणी, संतोष भोसले,भरत वाणी, अमोल जाधव, आण्णा जाधव आदी सहभागी होते.

# माल्य देशाच्या वर्धापन दिनास उद्योजक रसिक कुंकुलोळ प्रमुख अतिथी

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

रिपब्लिक माल्य देशाचा ६० वा स्वातंत्र्यदिना निमित्त मुंबई येथील हॉटेल ओबेरॉय येथे २० सप्टेंबर रोजी एका समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून येथील भूमिपुत्र उद्योजक रसिक कुंकुलोळ उपस्थित होते.तर यावेळी माल्य रिपब्लीक चे भारतातील उच्चूआयुक्त मि. रियुबेन गौसी, व त्यांच्या पत्नी डॉ ओल्गा गौसी. तचेच मुंबई येथील रिपब्लीक माल्टाच्या मानद वाणिज्य हुन मिस, चंद्रा रुईया सरकारी टेल डॉट कॉम चे मुख्य संपादक अमेय साठ्ये उपस्थित होते.

यावेळी बोलताना रसिक कुंकुलोळ म्हणले की प्रत्येक देशाने विश्वबंधुत्वाची शिकवण जोपासली पाहिजे. मानवता व मूल्ये जोपासत



केलेली प्रगती राष्ट्राला पुढे नेते.असे सांगून त्यांनी शुभेच्छा दिल्या. रसिक कुंकुलोळ अंबाजोगाई येथील भूमिपुत्रास हा आंतरराष्ट्रीय सन्मान मिळाल्या बद्दल त्यांचे सर्वत्र स्वागत होत आहे.

# राज्यपाल, मुख्यमंत्र्यांना खा.बजरंग सोनवणेंनी पाठविले पत्र मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण सोडविण्याची केली मागणी

बीड (प्रतिनिधी)

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील, अंतरवाली सराटीत (दि.१७) पासून आमरण उपोषणास बसले आहेत.त्यांची प्रकृती खालावत चाललेली आहे. त्यामुळे राज्यातील कोटी मराठ्यांचा आवाज असलेले संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण सोडविण्यासाठी तातडीने हालचाली कराव्यात, अशा मागणीचे पत्र बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना शनिवारी (दि.२१)दिले आहे. मराठा आरक्षण नेते मनोज जरांगे पाटील यांची खा.बजरंग सोनवणे यांनी अंतरवाली सराटीत जावून भेट घेत, त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करुन राज्यपाल व मुख्यमंत्री यांना पत्र पाठवून उपोषण सोडविण्याची मागणी केली.



मराठा आरक्षण नेते मनोज जरांगे पाटील, जीवाची परवा न करता, समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी संविधानिक आणि शांततेच्या मार्गाने आंदोलन करत आलेले आहेत. समाजाला आरक्षण मिळवून दिल्याशिवाय आता माघार नाही, भले जीव गेला तरी चालेल. अशी भूमिका मनोज जरांगे पाटील यांनी घेतलेली आहे. मराठा समाजाला त्यांचा शब्द अंतिम असून ते मराठा समाजाच्या काळजाचा विषय आहेत. राज्य सरकारने मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाकडे कदापिही दुर्लक्ष करता कामा नये. संविधानिक मार्गाने रास्त मागणी घेऊन आंदोलन सुरू असेल तर सरकारची आणि प्रशासनाची जबाबदारी आहे की, जातीने या आंदोलनाकडे लक्ष दिले पाहिजे. आमरण उपोषण सुरू होऊन एक आठवडा होत आला आहे. मात्र अद्यापही सरकारने पावले उचललेली नाहीत. ही बाब चिंतेची आहे. त्यामुळे राज्यपाल महोदय आणि मुख्यमंत्री यांनी जराही विलंब न करता, तातडीने उपोषण सोडविण्यासाठी पावले उचलावीत अशी मागणी खा. बजरंग सोनवणे यांनी दिलेल्या पत्रात केली आहे.

अंतरवाली सराटीत मराठ आरक्षणाचे संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील आमरण उपोषणास बसले आहेत. बीड जिल्ह्याचे खा.बजरंग सोनवणे यांनी त्यांची भेट घेऊन विचारपूस केली. यावेळी ते म्हणाले पाटील कोटी मराठी तुमच्या सोबत आहेत. समाजासाठी तुम्ही आज जीवाची परवा न करता उपोषण करत आहात. तुमचा हा लढा आमच्या मुलाबाळांच्या भवितव्यासाठी एक नवी पहाट असणार आहे. त्यामुळे तातडीने मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाची दखल घ्यावी.कारण मनोज जरांगे पाटील मराठा समाजाच्या अस्मितेचा विषय आहे. अशा लोकभावना खा.बजरंग सोनवणे यांनी व्यक्त केल्या.

## तुम्ही राजीनामा कधी देता?

# विधानसभा निवडणुकीपूर्वी कृषिमंत्री धनंजय मुंडेंना काँग्रेसचा सवाल, बीडमध्ये राजकीय घटनांना वेग

आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यात काँग्रेस सध्या चांगलीच ऍक्टिव्ह झाल्याचं दिसतंय. २३ तारखेला परळीत शेतकरी आक्रोश मोर्चा निघणार असून त्या विरोधात विरोधक आणि सत्ताधाऱ्यांमध्ये चांगलीच खडाजंगी पाहायला मिळत असून दोघांमधील राजकीय वातावरण चांगलंच तापलंय. ट्रॅक्टर आणि बैलगाडी मोर्चा काढण्यापेक्षा विरोधकांनी शेतकऱ्यांचा मोर्चा काढावा असा आव्हान कृषी मंत्र्यांनी केल्यानंतर काँग्रेस कमिटीचे सहप्रभारी कुणाला चौधरी यांनी मुंडेंच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. शेतकरी आत्महत्यासाठी मजबूर होतात, तुम्ही राजीनामा कधी देता असा सवाल चौधरी यांनी केलाय?

राज्य सरकारने मूळ प्रश्नाकडे लक्ष द्यावे



'विकत घेतलेला सरकारचे विकत घेतलेले धनंजय मुंडे कृषी मंत्री आहेत. मनमोहन सिंग यांच्या सरकारमध्ये शेतकऱ्यांच्या सोयाबीनला ५००० क्विंटल दर होता. मात्र पंतप्रधान मोदी यांनी शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करू असं म्हटलं होतं. त्यामुळे राज्य सरकारने मूळ प्रश्नाकडे लक्ष द्यावं', असं म्हणत काँग्रेस कमिटीचे सहभागी कुणाल चौधरी यांनी कृषिमंत्री धनंजय मुंडे यांना लक्ष्य केल्याचं दिसून आलं.

### तुम्ही राजीनामा कधी देता? कृषिमंत्र्यांना सवाल

कृषिमंत्र्यांनी चॅलेंज न देता शेतकरी लुटला का जातो? शेतकरी आत्महत्या साठी का मजबूर होत आहेत? हे सगळं होत असताना तुम्ही राजीनामा कधी देता असे सवाल चौधरी यांनी उपस्थित केले आहेत. ट्रॅक्टर आणि बैलगाडी मोर्चा काढण्यापेक्षा विरोधन विरोधकांनी शेतकऱ्यांचा मोर्चा काढावा असा आव्हान कृषी मंत्र्यांच्या कार्यकर्त्यांनी दिलं होतं. यालाच काँग्रेस कमिटीचे सहप्रभारी कोणाला चौधरी यांनी प्रत्युत्तर दिलं आहे.

# भगवान शिवाच्या डोळ्यातील अश्रूंपासून तयार झालेल्या रुद्राक्षाचा महिमा अगाध आहे

## त्यामध्ये एकमुखी ते १४ मुखी असे रुद्राक्ष असतात. समाधान महाराज शर्मा

अविनाश देशमुख शेवगांव ।९९६००५१७५५

शेवगाव : आधार नसेल तर तुमची साधना व्यर्थ ठरते. आयुष्य सार्थकी लावायचे असेल तर गुरुशिवाय तरुणोपाय नाही. भगवान शिवाच्या डोळ्यातील अश्रूंपासून तयार झालेल्या रुद्राक्षाचा महिमा अगाध आहे. त्यामध्ये एकमुखी ते १४ मुखी असे रुद्राक्ष असतात. त्याच्या नियमांचे पालन करुन धारण केल्यास माणसिक शांतता लाभते. संकटाच्या काळात भक्तांना आधार देण्यासाठी भोलेनाथ शिव नेहमी धावून येतो. त्यामुळे शिवाच्या नावाचा महिमा अगाध आहे. असे प्रतिपादन शिवकथाकार समाधान महाराज शर्मा यांनी केले.

स्व.मारुतराव घुले पाटील यांच्या ९४ व्या जयंती निमीत्त शेवगाव शहरातील खंडोबानगर मैदानावर येथे आयोजीत शिव महापुराण कथेमध्ये तिसरे पुष्प गुंफतांना शर्मा महाराज बोलत होते. यावेळी शिवशंभू व स्व.मारुतराव घुले पाटील यांच्या प्रतिमेचे पुजन माजी आमदार चंद्रशेखर घुले,माजी जिल्हा परिषद अध्यक्षा राजश्री घुले, येळेश्वर देवस्थानचे रामगिरी महाराज,पांडुरंग महाराज झंबड,उध्दव महाराज सबलस, दत्तात्रय महाराज कुलट,राम महाराज



उदागे, शिवाजी महाराज काळे,ज्ञानेश्वर महाराज बटुळे आदींच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी शर्मा महाराज म्हणाले की,वृध्द आई वडील ज्या घरात असतात आणि ते सुखी समाधानी असतात ते घर जगातील सर्वात श्रीमंत घर असते. त्यामुळे माणसे सांभाळायला शिका. जन्मदात्या आई वडीलांना अंतर देवू नका.नात्यामध्ये सुसंवाद ठेवा शक्ती आणि भक्तीची आराधना करणा-या शिवाच्या कृपेने आपल्याला काहीच कमी पडणार नाही.यावेळी शिव-पार्वतीच्या विवाह सोहळा मंगलमय वातावरणात पार पडला. आळंदी येथील संत ज्ञानेश्वर महाराज हे माऊली म्हणून नेहमीच जगण्याचे बळ देतात. ज्यांचे माऊलींवर प्रेम आहे त्यांना जीवनात कशाचेच कमी पडत नाही.म्हणूनच कथाकार,कीर्तनकार यांचे आळंदी हे प्रेरणास्थान आहे.येथील शिव महापुराण कथेमध्ये समाधान महाराज शर्मा यांच्यासह महाआरती करतांना माजी आमदार चंद्रशेखर घुले,माजी जिल्हा परिषद अध्यक्षा राजश्री घुले, येळेश्वर देवस्थानचे रामगिरी महाराज व भक्तगण.

शिक्षक संघटना, ज्येष्ठ नागरिक फिरस्ता ग्रुप व भोई समाज शेवगांव युवा पदाधिकारी व मान्यवर अतिथींच्या हस्ते महाआरती झाली.प्रवेशव्दारावर शिवपार्वतीच्या पुतळ्यासमोर शिव पुराणातील विविध प्रसंगावर आधारीत रांगोळीचे आकर्षक रेखाटन शहरातील जागृती खाथवटे व सोनाली हुशार या तरुणी करतात. कथा ऐकण्यासाठी तालुक्यातील भाविक भक्तांची उच्चाकी गर्दी वाढत आहे. त्याचे नियोजन करण्यासाठी शिव महापुराण कथा नियोजन समितीचे सर्व पदाधिकारी योग्य नियोजन करीत आहेत. त्याबद्दल ह.भ प. शिवमहापुराण कथा वाचक श्री. समाधान महाराज शर्मा यांनी विशेष अभिनंदन केले

अविनाश देशमुख शेवगांव
सामाजिक कार्यकर्ता / पत्रकार

# शेतकरी, उसतोड व इतर असंघटित महीला कामगार मंचच्या राज्याध्यक्षपदी मनिषा तोकले यांची निवड

बीड ।प्रतिनिधी

महिला देखील शेतकरी आहेत आणि त्यांचे देखील स्वतंत्र प्रश्न आहेत असा कधी विचार प्रामुख्याने समोर आला नाही त्यामुळेच महिला शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फटावी त्यांनाही हक्काचे प्रश्न मांडण्यासाठी हक्काचे व्यासपीठा असावे यासाठी शेतकरी, उसतोड व इतर असंघटित महीला कामगार मंचची स्थापना करण्यात आली असून या मंचच्या राज्याध्यक्षपदी मनिषा तोकले यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. शेतकरी म्हणून आज पर्यंत केवळ पुरुष शेतकरीच गृहीत धरला जात होता. शेतीमधील महिलांचे किम आणि ज्ञान असुनही महीलांना शेतकरी म्हणून ओळख मिळत नाही. शेतकरी शेतमजूर, ऊसतोड कामगार, अशा असंघटित क्षेत्रातील महीला शासकीय धोरणाचा भाग बनत नाहीत. त्या कायम वंचित राहतात.

महीला शेतकर्यांना शेतकरी म्हणून ओळख नसणे, जमिनीवरचा हक्क मिळविताना अडचणी येणे., कामाच्या ठिकाणी सुविधा न भेटणे, असे अनेक प्रश्न महीला शेतकर्यांचे आहेत. त्या प्रश्नाकडे सोयीस्कर पणे दुर्लक्ष केले जात आहे. अशा प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी तसेच नविन पर्याय शोधण्यासाठी शेतकरी, उसतोड व इतर



असंघटित महीला कामगार मंचाची ५ सप्टेंबर रोजी स्थापना करण्यात आली. या साठी महीला किसान अधिकार मंच( मकाम) ने पुढाकार घेऊन राज्य व्यापी बैठक एस एम जोशी फौडेशन, पुणे येथे आयोजित केली होती. या वेळी मंचाची राज्य कार्यकारीणीची सर्व सहमतीने निवड करण्यात करण्यात आली. यावेळी मकामच्या सदस्य सिमा कुलकर्णी, जेष्ठ समाजवादी नेते सुभाष वारे, मोलकरीण संघटनेच्या मेधा थत्ते, संघर्ष वाहिनीचे दीनानाथ वाघमारे, कागद काच पत्रा कष्टकरी संघटनेच्या सुरेखा गाडे, व शुभदा देशमुख, शेतकरी नेत्या कुमारी बाई जम कातन, सरिता मेश्राम, माधुरी खडसे, जोती थोरात रीना राऊत उपस्थित होत्या. विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, कोकण, आणि पश्चिम महाराष्ट्र अशा विविध विभागातून जवळपास १०० शेतकरी महीला उसतोड, मासेमारी व जंगलात काम करणाऱ्या महीला प्रतिनिधींनी बैठकीत आपले प्रश्न मांडले.

दोन दिवस सुरु असलेल्या या बैठकीत शेतकरी, उसतोड व इतर असंघटित महीला कामगार मंचाची थापना झाली. व महाराष्ट्र राज्याची कार्यकारीणी जाहीर करण्यात आली. अध्यक्ष मनिषा तोकले , उपाध्यक्ष वैशाली पाटील, छाया पडघम, रंजना कान्हेरे, सरिता मेश्राम, शर्मिला केदार, सचिव क्रांती खळगे, भेटी पाडवी, प्रमिला पात्र, सदस्य ज्योती थोरात, रेखा हाते, मानसेवी सदस्य सिमा कुलकर्णी, शुभदा देशमुख यांची निवड करण्यात आली आहे.

# शिरूरच्या पावन गणपती मंदिरासाठी वीस लाखांचा निधी मंजूर –माजी मंत्री सुरेश धस यांची घोषणा

मानूर ।प्रतिनिधी

शिरूर शहरातील भाविकांचे श्रद्धास्थान तथा ग्रामदैवत श्री पावन गणपती मंदिराच्या नूतनीकरण कामासाठी वीस लक्ष रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.माजी मंत्री सुरेश धस यांनी सदरील निधी जाहीर केला आहे.पावन गणपती मंडळ आणि व्यापारी बांधवांच्या शिष्टमंडळाने माजी मंत्री सुरेश धस यांची त्यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट घेवून मंदिराच्या नूतनीकरण कामाची गरज असल्याची मागणी केली होती.त्या मागणीचा विचार करून धस यांनी हा निधी मंजूर केला आहे.गणेशोत्सव काळात शिष्टमंडळाच्या निमंत्रणाला मान देवून सुरेश धस यांनी गणपती मंदिराला भेट दिली होती.या वेळी गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी



मंदिराचे काम लोकवर्गणीतून सुरू असल्याचे सांगितले.त्यानंतर उर्वरित कामासाठी निधीची गरज असल्याचे सांगितल्यानंतर त्यांनी तात्काळ दहा लक्ष रुपये देण्याचे जाहीर केले होते.परंतु सदरील निधी सुशोभीकरण आणि शिखराच्या कामासाठी पुरेसा नसल्याचे शिष्टमंडळाने भेट घेवुन सांगितल्यानंतर त्यांनी वीस लक्ष रुपयांचा निधी देणार असल्याचे सांगितले.तसेच सदरील कामाला लवकरच सुरुवात करणार असल्याचा शब्द देखील दिला.या वेळी शिष्टमंडळात पत्रकार गोकुळ पवार यांच्यासह गोविंद मामा गाडेकर,सुधीर भांडेकर,प्रमोद दगडे,मोहन गायकवाड,बबन वदपाठक,नागेश गाडेकर,लक्ष्मीनारायण कासट,रवि गायकवाड,सुरेश दगडे,विनोद दगडे यांची उपस्थिती होती.

# आदित्य कृषि महाविद्यालयाने बैलपोळा उत्सव साजरा करून विद्यार्थी, समाजाचे प्रबोधन उत्कृष्ट पद्धतीने केले- कुलगुरु डॉ. इंद्रा मणी

बीड (प्रतिनिधी)

विष मुक्त शेती करण्यासाठी आधुनिक काळात पशुधन सांभाळणे ही काळाची गरज आहे. वाढत्या आधुनिकीकरणामुळे व मराठवाडा विभागातील दुष्काळ परिस्थितीमुळे बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा पशुधन सांभाळण्याकडे कल कमी दिसत आहे. येणाऱ्या पिढीने पशुधन सांभाळावे यासाठी आदित्य कृषि महाविद्यालयाने बैलपोळ्यासारखे उत्सव साजरे करून विद्यार्थ्यांचे आणि समाजाचे प्रबोधन करण्याचे काम अतिशय उत्कृष्ट पद्धतीने केले. असे प्रतिपादन वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणीचे कुलगुरू डॉ. इंद्रा मणी यांनी केले.

ते आदित्य कृषि महाविद्यालयाच्या वतीने १८ सप्टेंबर रोजी वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी संलग्न व आदित्य शिक्षण संस्था (बी संकुल) संचलित आदित्य कृषि महाविद्यालयांच्या माध्यमातून बैल पोळा निमित्त आयोजित ई- निबंध स्पर्धा व व्हिडिओ/ रिल्स बनवणे स्पर्धा-२०२४ च्या बक्षीस वितरण समारंभामध्ये अध्यक्षीय भाषणात बोलत होते. यावेळी व्यासपिठावर संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा, वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणी च्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ.आदिती सारडा यांची प्रमुख उपस्थिती होती.

बैल पोळा निमित्त आयोजित ई- निबंध स्पर्धा व व्हिडिओ/ रिल्स बनवणे स्पर्धा आयोजित केल्यामुळे पोळा हा सण कशाप्रकारे साजरा केला जातो. याची माहिती विद्यार्थ्यांसह इतरांना चांगल्या प्रकारे मिळाली. अशा पद्धतीचा उपक्रम महाविद्यालय राबवला याबाबत वसंतराव नाईक मराठा कृषी विद्यापीठाचे संचालक शिक्षण अधिष्ठाता डॉ.उदय खोडके यांनी संस्थेचे व



महाविद्यालयाचे अभिनंदन केले.कुलगुरू डॉ. इंद्रा मणी, डॉ. उदय खोडके यांच्या हस्ते स्पर्धेत परितोषीक मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. आदित्य महाविद्यालयाने उत्कृष्ट बैल पोळा सणानिमित्त आयोजित केलेल्या स्पर्धेबद्दल कुलगुरू डॉ. इंद्रा मणी यांनी आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका व वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणीच्या कार्यकारी परिषद सदस्य डॉ.आदिती सारडा यांचे कौतुक केले.ए अशा प्रकारचे उपक्रम केल्याबद्दल विद्यापीठामार्फत आभार व्यक्त केले. विजेत्या सर्व स्पर्धक आणि ज्यांनी भाग घेतला असे सर्व स्पर्धकांचे त्यांनी कौतूक केले. आदित्य शिक्षण संस्था नेहमीच समाज उपयोगी उपक्रम राबवत असते त्यामुळे सुजलाम भारताचे ऐक उत्कृष्ट नागरिक घडत आहे असे गैरोउद्गार विद्यापीठाचे संचालक तथा अधिष्ठाता (कृषि) डॉ. उदय खोडके यांनी आपल्या भाषणात काढले. यावेळी आदित्य कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ कल्याण आपेट, श्याम भुतडा यांच्यासह आदित्य शिक्षण संस्थेचे विद्यार्थी प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदित्य कृषि महाविद्यालयाचे उपप्राचार्य व स्पर्धेचे समन्वयक डॉ. संदीप मोरे यांनी केले. आभार आदित्य शिक्षण संस्थेच्या वतीने डॉ कल्याण आपेट यांनी मानले.महाराष्ट्रातून ३५९ ई-निबंध, २१३ व्हिडिओ/ रिल्स

सदरील स्पर्धेसाठी महाराष्ट्रातून विविध कृषि व कृषि संलग्न महाविद्यालयातून ३५९ ई-निबंध, २१३ व्हिडिओ/ रिल्स व १५४ कृत्रिम बैलजोडी व्हिडिओ/ रिल्ससाठी आले होते.परभणीच्या नंदेश्वरी देवयानी कैलास ने मिळवले प्रथम परितोषीकनिबंध स्पर्धेमध्ये प्रथम पारितोषिक नंदेश्वरी देवयानी कैलास, कृषि महाविद्यालय, पाथरी, जिल्हा-परभणी, द्वितीय पारितोषिक काशीद पूजा सुभाष, आदित्य कृषि महाविद्यालय, बीड, तृतीय पारितोषिक मुळे स्नेहल दादासाहेब शासकीय कृषि महाविद्यालय, किणी, धाराशिव, सजीव बैलजोडी व्हिडिओ/ रिल्स स्पर्धेमध्ये प्रथम पारितोषिक राठोड सुनील बंडु, आदित्य कृषि महाविद्यालय, बीड, द्वितीय परदेशी पारितोषिक चव्हाण प्रवीण गंगाधर कृषि महाविद्यालय, बदनापूर व तृतीय पारितोषिक राजश्री बालकिशन अटल (भूतडा) आदित्य व्यवस्थापकीय पदव्युत्तर पदवी महाविद्यालय, बीड, कृत्रिम बैलजोडी व्हिडिओ/ रिल्स स्पर्धेमध्ये प्रथम पारितोषिक सुरज आबासाहेब पवार, आदित्य कृषि महाविद्यालय, बीड, द्वितीय पारितोषिक पालवे भागवत गोवर्धन, आदित्य कृषि व जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, बीड, तृतीय पारितोषिक पाखरे प्रमोद सुखदेव आदित्य अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय, बीड यांची निवड करण्यात आली.

# लोकशाही पत्रकार संघाच्या सारिका यादव,अमोल घोडके, अँड श्रीकांत जाधव यांच्या निवडी जाहीर





बीड (प्रतिनिधी)

पत्रकारांचा बुलंद आवाज म्हणून ओळख असणाऱ्या लोकशाही पत्रकार संघाच्या महाराष्ट्र राज्य महिला व बाल कल्याण विकास समिती महिला आघाडी च्या प्रदेश अध्यक्षा पदी सारिका यादव, उद्योग विकास समिती च्या मराठवाडा अध्यक्ष अमोल घोडके , तर कायदेशीर विधी सल्लागार समिती मराठवाडा अध्यक्ष पदी यांची निवड सं. अ. बीबी वैद्य, राष्ट्रीय उपाध्यक्ष संदीप जाधव, प्रदेश उपाध्यक्ष साजेद सय्यद,यांनी केली आहे. लोकशाही पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष भागवत (बीबी ) वैद्य, प्रदेश उपाध्यक्ष पोलीस मित्र विकास समिती राणी शेख, पूर्व बीड जिल्हा अध्यक्ष आत्माराम ओव्हळ, पश्चिम बीड जिल्हा अध्यक्ष बिलाल शेख, महिला बचत गट बीड जिल्हा अध्यक्ष संजीवनी खोगरे यांच्या हस्ते त्यांना निवडीचे नियुक्तीपत्र देण्यात आले. राज्यभरात लोकशाही पत्रकार संघामुळे पत्रकारांचे मजबूत संघटन उभारले जात आहे. पत्रकारांना विमा कवच, त्यांच्या पाल्यांचे शिक्षण, घर, नवे तंत्रज्ञान कौशल्य, सेवानिवृत्तीनंतरच्या आयुष्याचे नियोजन या प्रश्नांकडे लोकशाही पत्रकार संघाने लक्ष केंद्रित केले असल्याने राज्यभरातील पत्रकारांचा देखील मोठा प्रतिसाद लोकशाही पत्रकार संघाला मिळत आहे. पत्रकार हा लोकशाहीचा महत्वाचा स्तंभ असूनही तो अनेक मुलभूत सुविधांपासून वंचित आहे, त्याच्या संरक्षणाचा प्रश्न मागे पडला आहे, तो लोकशाहीचा महत्वाचा घटक असूनही निराधार असल्याचे दिसते आहे. लोकशाही चे जतन करणे आता लोकशाही पत्रकार संघाचे काम आहे. असे मत अँड श्रीकांत जाधव यांनी व्यक्त केले.यासोबतच डिजिटल मीडिया'ला पत्रकारितेच्या मुख्य प्रवाहात घेतले जात नाही. 'डिजिटल मीडिया'चे काम करणाऱ्या पत्रकारांन त्यांचे अधिकार मिळत नाहीत.

'डिजिटल मीडिया'तल्या सर्व पत्रकारांना मुख्य प्रवाहात आणणे आणि त्यांचे अधिकार मिळवून देणे यासाठी भविष्यात आमची लढाई असेल.त्याच बरोबर महिला व बाल कल्याण समितीचे माध्यमातून त्यांचा विकास करणे गरजेचे आहे. असे सारिका यादव यांनी सांगितले. ऑनलाईन क्षेत्रात काम करत असलेल्या पत्रकारांच्या पाठीशी ठाम पणे उभे राहून त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी भविष्यात काम करणार असल्याचं सांगत, मराठवाड्यात उद्योग क्षेत्रात पत्रकारणी पुढाकार घेऊन आर्थिक बाजू मजबूत केली पाहिजे. यासाठी मी सर्वतोपारी सहकारी करिन असे अमोल घोडके यांनी सांगितले.या मराठवाडा पातळीवरील महत्त्वाच्या पदावर निवड करत काम करण्याची संधी दिली म्हणून अध्यक्ष भागवत वैद्य व लोकशाही पत्रकार संघाच्या सर्व टीमचेही आभार मानले. एकंदरीत या निवडीनंतर महिला व बाल कल्याण विकास समिती महिला आघाडी च्या प्रदेश अध्यक्षा पदी सारिका यादव, उद्योग विकास समिती च्या मराठवाडा अध्यक्ष अमोल घोडके , तर कायदेशीर विधी सल्लागार समिती मराठवाडा अध्यक्ष पदी यांच्यावर विविध माध्यमातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.पुढील कार्यास लोकशाही पत्रकार संघाच्या पदाधिकारी व डावीकडून ड. जहीर पठाण बीड जिल्हा वकील संघाचे सहसचिव ड. श्रीकांत जाधव सचिव ड. यासेर पटेल ड. सय्यद साजिद ड. फिरोज उपाध्यक्ष ड. अविनाश गडगे यांनी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# विजय जाहेर यांची महाराष्ट्र महिला खो - खो संघाचे प्रशिक्षकपदी नियुक्ती

## खेलो इंडिया महिला लिगसाठी निवड झाल्याने सर्व स्तरातून अभिनंदन



बीड (प्रतिनिधी)

बीड जिल्ह्यातील गेवराई येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित न्यू हायस्कूल शाळेतील क्रीडाशिक्षक तथा बीड जिल्हा खो -खो संघटनेचे सचिव, राष्ट्रीय खो -खो खेळाडू विजय जाहेर यांची खेलो इंडिया महिला खो-खो लीगसाठी महाराष्ट्र मुलींच्या संघाचे प्रशिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. वडोदरा, गुजरात येथे २६ ते ३० सप्टेंबर दरम्यान होणाऱ्या पश्चिम विभागीय खेलो इंडिया महिला लिगसाठी मुलीचा संघ घोषित करण्यात आला आहे . या संघाच्या प्रशिक्षक पदी विजय भागवत जाहेर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीमुळे त्यांचे अभिनंदन होत आहे . विजय जाहेर यांचे महाराष्ट्र खो- खो असोसिएशनचे आश्रयदाता तथा राज्याचे उपमुख्यमंत्री नामदार अजितदादा पवार, खो-खो संघटनेचे अध्यक्ष संजीव नाईक निंबाळकर, कार्याध्यक्ष सचिन गोडबोले, खजिनदार ड. गोविंद शर्मा, सरचिटणीस प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव यांच्यासह महाराष्ट्राचे कबड्डी संघटनेचे उपाध्यक्ष माजी आमदार अमरसिंह पंडित, बीड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विजयसिंह पंडित, शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे संचालक रणवीर पंडित, महाराष्ट्र खो-खो संघटनेचे ज्येष्ठ संघटक शिवछत्रपती पुरस्कार विजेते प्रा. शेळके जे पी, बीड जिल्हा खो - खे संघटनेचे अध्यक्ष ऋषिकेश शेळके, रमेश भाऊ शिंदे, तसेच न्यू हायस्कूल शाळेचे मुख्याध्यापक अंकुशराव तौर, योगेश सोळशे, मनोज जोगदंड, विनोद शिंदे, कछवाय मॅडम, प्रफुल हाटवटे यांच्यासह शालेय समितीचे सर्व सदस्य, पंच, प्रशिक्षक व क्रीडाशिक्षक आदींनी विजय भागवत जाहेर यांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत .

# मराठा आरक्षणा साठी धारूर बंद कडकडीत तहसील कार्यालयाला निवेदन



**किल्लेधारूर / रोहित फावडे**

**मराठा समाजाला कुणबीचे ओ बी सी प्रमाणपत्र तात्काळ द्यावे व मनोज जंरागे यांचे उपोषण तात्काळ सोडवावे या साठी धारूर शहर सकल मराठा समाजाचे वतीने कडकडीत बंद पाळण्यात आला. तहसील प्रशासनाला निवेदन देण्यात आले.**


सकल मराठा समाजाचे वतीने मराठा समाजाला कुणबी चे ओ बी सी प्रमाणपत्र तात्काळ द्यावे मनोज जरांगे यांचे या मागणी पुर्ण करून तात्काळ त्यांचे उपोषण सोडवावे या मागणी साठी २१ सप्टेबंर रोजी धारूर बंदचे आवाहण करण्यात आले होते सकल मराठा समाजाचे युवक कार्यकर्त्यानी शहरात फिरून बंदचे आवाहण करण्यात आले. शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला तहसील कार्यालयास नायबतहसीलदार नजीर कुरेशी यांना निवेदन देण्यात आले. शहरात सर्व व्यवहार कडकडीत दिवसभर बंद होते. सर्वत्र शुकशुकाट होता. सकल मराठा समाजाचे युवक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थीत होते घोषणा देत शहरातून बंद चे अवाहण करत मुख्य बाजारपेठेत फेरी मारली. दिवसभर बाजारपेठ कडकडीत बंद पाळण्यात आला.

# स्वामी विवेकानंद शिक्षक पतसंस्थेच्या संचालकांनी शिक्षक सेवक म्हणून काम करावे - राजेंद्र लाड

आष्टी (प्रतिनिधी)

स्वामी विवेकानंद शिक्षकांची सहकारी पतसंस्था मर्या. कडा, ता. आष्टी, जि. बीड ची सुवर्ण महोत्सवी वर्षा निमित्त संपन्न होणारी ५० वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि.२२ सप्टेंबर २०२४ रोजी, वेळ सकाळी १०:३० वा. अंबिका लॉन्स नगर - जामखेड रोड, शेरी बु. येथे आयोजित केलेली आहे. तरी पतसंस्थेच्या सर्व सभासद बंधू - भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन सभासद तथा दिव्यांग कर्मचारी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र लाड यांनी केले आहे.

वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सर्वप्रथम अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांचे स्वागत होईल, आपल्या पतसंस्थेने गौरविलेले आदर्श शिक्षक पुरस्कार पात्र शिक्षक, आपल्या पतसंस्थेने गौरविलेल्या उपक्रमशील शाळा, सेवानिवृत्त सभासद बंधू भगिनी, आंतरजिल्हा बदली झालेले शिक्षक व इतर क्षेत्रात नावलौकिक मिळविलेले शिक्षक या सर्वांचा सत्कार आपल्या सर्वांच्या वतीने मान्यवर अध्यक्ष व पाहुण्यांच्या हस्ते करणार आहोत. या कार्यक्रमानंतर स्नेहभोजन होवुन दुपारी २ वाजता वार्षिक सर्वसाधारण सभेचे कामकाज विषय पत्रिकेनुसार होणार आहे. तेंव्हा सर्वांनी अगदी वेळेवर कार्यक्रमास उपस्थित रहावे.



आगामी काळात पतसंस्थेच्या संचालक मंडळांनी सर्व मतदार बंधू - भगिनींच्या सुख - दुखाःत सहभागी व्हावे तसेच त्यांच्या शैक्षणिक कार्यातील येणाऱ्या अडीअडचणी तात्काळ सोडवून त्यांना मदतीचा हात द्यावा. तालुक्यातील सर्व संघटनांचा आदर ठेवावा. गरज सरो वैद्य मरो असे आपले वर्तन यापुढे नसावे. यामध्ये कसल्याही प्रकारचा दूजाभाव न ठेवता सर्वांना पतसंस्थेच्या वेगवेगळ्या कार्यक्रमात सहभागी करुन घ्यावे. संस्थेत निवडून आलेले संचालक यापुढे फक्त संचालक नसून शिक्षक सेवक आहेत. याची जाणीव ठेवावी.

आपल्या सदिच्छा पँनलचा जाहिरनामा व त्यामधील दिलेल्या सर्व बाबींची पूर्तता करण्याचा अटोकाट प्रयत्न करावा नव्हे नव्हे तर वेळोवेळी त्या सभासदांच्या निदर्शनास आणून द्याव्यात. आपली पतसंस्था प्रसिद्धी पासून दूर ठेवू नये. यासाठी वेळोवेळी चांगल्या योजनांची, पतसंस्थेने घेतलेल्या चांगल्या कार्यक्रमांची माहिती वेगवेगळ्या दैनिकातून प्रसिद्ध करावी. आपण खुपच सभासदांच्या हिताचे कार्य केलेले आहे पण ते सभासदांपर्यंत पोहचत नाही हे आपण नुकतेच मागे झालेल्या संस्थेच्या निवडणूकीत पाहिले आहे. असो शेवटी सध्या प्रसिद्धीचे युग आहे याची कल्पना आपणांस असावी. सध्या शिक्षकांना अनेक आँनलाईन कामे करावी लागत आहेत. त्यामुळे पाहिजे तेवढा वेळ त्यांना शैक्षणिक कामकाजासाठी देता येत नाही तसेच शिक्षकांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत यासाठी एकत्रितपणे लढा देण्याची काळाची गरज आहे. म्हणूनच पतसंस्थेच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव व संचालक यांनी तालुक्यातील सर्व संघटनांना एकत्रित करुन समन्वय समिती स्थापन करुन शिक्षक सेवक म्हणून भूमिका बजवावी असे शेवटी राजेंद्र लाड यांनी म्हटले आहे.

# डॉ अमर आलदे यांना 'हिंदी काव्यरत्न' आंतरराष्ट्रीय पुरस्कार जाहीर

चौसाळा (प्रतिनिधी)

कला व विज्ञान महाविद्यालय, चौसाळा येथील नवोदित कवी डॉ अमर आनंद आलदे यांचा नेपाळमधील लुंबिनी येथे आयोजित आंतरराष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रमात गौरव करण्यात आला आहे. नेपाळमधील शब्द प्रतिभा बहु-प्रादेशिक फाउंडेशन नेपाळ या प्रसिद्ध संस्थेने आज ऑनलाइन स्पर्धेद्वारे भाषा आणि साहित्य क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या निर्मात्यांना सन्मानित केले आहे.

१४ सप्टेंबर हिंदी दिवसानिमित्त शब्द प्रतिभा बहु-प्रादेशिक पुरस्कार फाउंडेशन नेपाळ द्वारा आयोजित केलेल्या हिंदी दिवस आंतरराष्ट्रीय काव्य स्पर्धेत अष्टपैलू शिक्षक आणि युवा साहित्यिक डॉ अमर आनंद आलदे यांना हिंदी काव्यरत्न मानद पदवी देऊन गौरविण्यात आले. हे जिल्ह्यातील एक नवोदित कवि आहेत.

संस्थे चे संस्थापक अध्यक्ष आनन्द गिरि मायालु म्हणतात - डॉ अमर आलदे यांची रचना जीवंत वाटते.



यांच्या कवितेतील शब्द लालित्य वैविध्यपूर्णतेने नटलेले आहे. अशा लेखकांकडूनच खरा समाज निर्माण होतो ज्या द्वारे विकासात्मक व सकारात्मक लेखन केले जाते. अशा विशिष्ट रचनाकरांना ओळखून त्यांचा गौरव करणे हे अपेक्षित आहे.आयोजित या स्पर्धेत नेपाळ, भारत, अमेरिका, कॅनडा आणि टांझानिया येथील ६७४२ स्त्री-पुरुष कवि व लेखक सहभागी झाले होते, ज्यामध्ये उत्कृष्ट कवितांच्या आधारे ६७५ कलावंतांची निवड करून त्यांना गौरविण्यात आले. आयोजक संस्थेचे आभार मानताना आंतरराष्ट्रीय हिंदी काव्यरत्न पुरस्कार प्राप्त नवोदित कवी डॉ. अमर आलदे म्हणाले नेपाळ स्थित शब्द प्रतिभा फाउंडेशन वर्षानुवर्ष देश-विदेशातील कवी-लेखकांना विविध स्पर्धांच्या माध्यमातून सन्मानित करून प्रोत्साहन देत आहे. संस्थेच्या अशा कार्यामुळे आमच्यासारख्या हजारो शिक्षक आणि कवींना प्रोत्साहन मिळाले आहे यात शंका नाही. संस्थेच्या सचिव रचना कौर म्हणतात - आज हिंदी ही कोणा एका देशाची भाषा नसून जागतिक भाषा बनली आहे. सर्वांनी आपली भाषा, साहित्य, कला, संस्कृती यांचा आदर केला पाहिजे. या स्पर्धेत देश-विदेशातील हजारो शिक्षक-लेखक सहभागी झाले होते, ही संस्थेसाठी अभिमानाची बाब आहे.

काव्यरत्न पुरस्कार बाबत नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. भारतभूषण क्षीरसागर, उपाध्यक्ष तथा सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. दीपा क्षीरसागर, सहसचिव डॉ. योगेश भैय्या क्षीरसागर, सदस्य डॉ. सारिकाताई क्षीरसागर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास भिल्लारे, उप प्राचार्य प्रा. चांगदेव शेळके, पदव्युत्तर संचालक डॉ. सुधाकर वनवे कमविचे उपप्राचार्य प्राध्यापक गणपती ढवळशंक व महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी डॉ. आलदे यांचे अभिनंदन केले.



**माजलगाव येथील तुळजाभवानी अर्बन यांच्या वार्षिक सर्वसाधारण सभा कार्यक्रम प्रसंगी चेअरमन चंद्रकांत शेजुळ यांच्या सत्कार करताना पत्रकार विष्णू उगले, परमेश्वर सोळंके, उमेश जेथलिया, बाळासाहेब आडागळे, अरविंद ओव्हाळ,अमर साळवे, सुदर्शन स्वामी,किसन भदर्गे व आदी**



**काल बीड तालुक्यातील मौजे इमामपुर येथे गावकऱ्यांच्या वतीने बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी बैलगाडा शर्यतीचा शुभारंभ करून सर्व गावकऱ्यांना शुभेच्छा दिल्या.यावेळी परीसरातून बैलगाडा शर्यत प्रेमी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते म्हणाले की आजही ग्रामीण भागातील शेतकऱ्यांने बैलगाडी शर्यत हा परंपरागत खेळ जोपासला आहे,या बैलगाडा शर्यतीच्या माध्यमातून शेतकरी मोठ्या प्रमाणात हा छंद जोपासतात याचे समाधान वाटते असे मत याप्रसंगी व्यक्त केले.. यावेळी उपजिल्हाप्रमुख राजूभाऊ महूवाले, तालुका प्रमुख गोरख आण्णा सिंघण, माजी सरपंच वैजनाथ नेवाळे, मुकादम नवनाथ साळुंके, विनोद गूंड पाटील, अजय गायकवाड, निलेश पवार, चंद्रसेन चव्हाण,बाळू चव्हाण सह परिसरातील बैलगाडा शर्यत प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते...!!**

# शिक्षकांच्या विवीध मागण्यासाठी २५ सप्टेंबर च्या मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे

कार्याध्यक्ष प्रशांत गाडेकर

शिरुर कासार (प्रतिनिधी)

दिनांक २५ सप्टेंबर रोजी बीड येथील जिल्हाधिकारी कार्यालय येथे होत असलेल्या शिक्षकांच्या विविध मागण्यासाठी हजारोंच्या संख्येने या मोर्चात उपस्थित राहून हा मोर्चा यशस्वी करावा असे आवाहन कास्ट्रईब जनरल कल्याण महासंघाचे तालुका कार्याध्यक्ष प्रशांत गाडेकर सर यांनी केले आहे शिक्षकांच्या ऑनलाइन कामातून मुक्तता अशैक्षणिक कामे २० पटसंख्या असलेल्या शाळा बंद करू नये १५ मार्च २०२४ व ५ सप्टेंबर २०२४ च्या शासन निर्णय रद्द करण्यात यावा वेतन त्रुटी पदवीधर शिक्षकांना जुने पेन्शन लागू करावी व प्राथमिक शिक्षकांना १० २० ३० अस्तित्व प्रगती योजना या व आदी मागण्यासाठी या लढ्यात हजारोंच्या संख्येने सहभागी होऊन हा लढा यशस्वी करावा हा लढा कुण्या एकट्या चा नाही तेव्हा प्रत्येक शिक्षकांनी या लढ्यात सहभागी होऊन आपली ताकद दाखववी व या लढ्याचे गंभीर दखल घेऊन हा लढा मोर्चा यशस्वी करावा या शासनाच्या मनमानी कारभाराचा निषेध नोंदवण्यासाठी हीच योग्य वेळ असल्याचेही त्यांनी म्हटले आहे

या सर्व कामामुळे आध्यापन कार्याकडे दुर्लक्ष होउन त्याचा परिणाम थेट विद्यार्थ्यांच्या भविष्यावर होत आहे शिक्षण मंत्री यांनी या परिस्थितीचा आढावा न घेता शासन चा जीआर काढून शिक्षकास नको त्या कामात जुंपत आहेत त्यामुळे मित्रांनो आता सर्वांनी ही बाब लक्षात घेऊन हात लढा मोर्चा माझ्या हक्कासाठी व न्यायासाठी असे म्हणून व्यक्तिगत रित्या मोर्चात सहभागी व्हावे असे आवाहन कास्ट्राईब जनरल कर्मचारी कल्याण महासंघाच्या वतीने शिरूर कासार कार्याध्यक्ष प्रशांत गाडेकर यांनी केले आहे यावेळी संघटनेचे अध्यक्ष विष्णू मिसाळ सचिव संतोष रंधवे आप्पासाहेब खाडे अंकुश खेडकर रंजना खेडकर मिसाळ मॅडम सौ गिरी मॅडम राजू दहिफळे जीवन खेडकर बाळासाहेब वाघ सर पांडुरंग गिरे महादेव आव्हाड वाघुंब्रे सर नितीन कैतके गणेश मिसाळ बंडू खेडकर अरविंद खेडकर विनायक कीर्तने सुनील फुंदे शैलेश अंदुरे यासह अनेक शिक्षकांची उपस्थिती होती तेव्हा येणाऱ्या २५ सप्टेंबर रोजी च्या या मोर्चामध्ये बहुसंख्यांनी उपस्थित राहून हा लढा यशस्वी करावा असेही यावेळी नमूद करण्यात आले आहे

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT